# पुरुषांसाठी आध्यात्मिकदृष्ट्या उपयुक्त असलेले कपडे

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


- मनोगत ८
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य १०
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ १४
- ज्ञान-प्राप्तकर्त्या साधकांचा परिचय १६

१. जसा देश तसा वेश ! १७
२. युगानुसार आचार आणि वस्त्रे (पोशाख) यांत पालट होणे १७
३. पाश्चात्त्य वापरत असल्याप्रमाणे अयोग्य कपडे १८
    ३ अ. शर्ट-पँट आणि बुशशर्ट-पँट १८
        * शर्ट घातल्यास तो पँटमध्ये न खोचता बाहेर काढणे १९
    ३ आ. कोट-पँट (सूट) २०
        * कोट-पँट (सूट) घातल्यामुळे होणारे तोटे २१
    ३ इ. टाय आणि बँड ('फुली'च्या आकाराचा लहान टाय) २२
        * टायच्या माध्यमातून वाईट शक्तींना जिवाचा कंठ, छाती आणि पोट यांवर आक्रमणे वाढवून ते निकामी करणे सोपे जाणे आणि त्याद्वारे जिवावर नियंत्रण (ताबा)मिळवणे सोपे जाणे २४
    ३ ई. कोट आणि टाय घातलेल्या व्यक्तींकडे पाहून साधिकेला जाणवलेली सूत्रे (मुद्दे) २५
    ३ उ. 'हॅट' आणि 'कॅप' २५
४. हिंदु संस्कृतीनुसार असलेले योग्य कपडे २५
    ४ अ. हिंदु धर्मातील आश्रमव्यवस्थेनुसार मुंज झालेला (बटू), सोडमुंज झालेला आणि गृहस्थाश्रमी यांनी नेसावयाची वस्त्रे २६
    ४ आ. अंगरखा (सदरा) २६

* साधना न करणाऱ्या म्हणजे सर्वसामान्य व्यक्तीने पूर्ण बाहीचा अंगरखा वापरणे इष्ट ठरणे २७
* साधक आणि शिष्य यांनी अर्ध्या बाहीचा अंगरखा वापरणे इष्ट ठरणे २८
४ इ. धोतर, सोवळे (कद) आणि पितांबर ३०
* धोतर नाभीवर नेसल्यामुळे वाईट शक्तींच्या आक्रमणांपासून पूर्णतः रक्षण होणे ३०
* निऱ्यांमुळे कटीखालच्या (कमरेखालच्या) भागात सतत चैतन्याचा पुरवठा होत असल्यामुळे तेथील काळी शक्ती नष्ट होणे ३१
४ ई. धोतर-अंगरखा ४०
* वाईट शक्तींचा तीव्र त्रास असणाऱ्या साधकांना धोतर-अंगरखा यांच्यातील सात्त्विकतेमुळे आलेले त्रासदायक अनुभव ४७
* धोतर-अंगरखा या वेशभूषेच्या संदर्भातील चांगल्या अनुभूती ४८
४ उ. धोतर आणि लुंगी ५०
* त्या त्या वायूमंडलातील साधनेला पूरक अशी वेशभूषा म्हणजे उत्तर भारतातील ‘सोवळे’ आणि दक्षिण भारतातील ‘लुंगी’ ५०
* लुंगी ही दक्षिणेत रुळलेली रुढीयुक्त परंपरा असणे आणि लुंगीपेक्षा धोतर श्रेष्ठ असणे ५१
४ ऊ. पायजमा ५३
* धोतर हे पायजम्यापेक्षा श्रेष्ठ असणे ५५
४ ए. उपरणे ४ ऐ. शाल ५५
४ ओ. फेटा ५७
* फेटा किंवा टोपी घालण्याची पद्धत का निर्माण झाली ? ५७
* फेट्याच्या रचनेमुळे सात्त्विक लहरींचे देहात संवर्धन होण्यास साहाय्य होणे ५७
* फेट्यामुळे देवतांच्या तत्त्वयुक्त सूक्ष्म-लहरी ग्रहण केल्या गेल्यामुळे जिवाच्या स्थूल, मनो, कारण अन् महाकारण या देहांची शुद्धी होणे ५८
* फेट्याचे उद्देशानुसार रंग आणि आध्यात्मिक पातळीनुसार फेटा वापरणे ६०
४ औ. पांढरी चपटी टोपी (गांधीटोपी) ६१

५. विविध वस्त्रांची तुलना ६१
* जीन्स आणि टी-शर्ट, बुशशर्ट / शर्ट-पँट, अंगरखा (सदरा)-पायजमा, सोवळे अन् वल्कले ६१
* जीन्सची पँट आणि टी-शर्ट यांमध्ये नगण्य, बुशशर्ट / शर्ट-पँट यांमध्ये अत्यल्प प्रमाणात, तर अंगरखा-पायजमा घातल्याने जास्त प्रमाणात ईश्वरी चैतन्य ग्रहण करता येणे; परंतु सोवळे परिधान केल्याने देवतेची तारक-मारक आणि सगुण-निर्गुण तत्त्वे ग्रहण करणे सोपे जाणे ६२
* कपड्यांचे प्रकार आणि ते चांगल्या किंवा वाईट शक्तीने भारित होण्याचे प्रमाण ७६
६. कपड्यांचा प्रकार, रंग आणि त्यातून मिळणाऱ्या सात्त्विकतेचे प्रमाण ७७
७. विविध प्रकारच्या टोप्या (हॅट, पांढरी चपटी टोपी (गांधीटोपी), सनातनने निर्मिलेली सात्त्विक टोपी) ७८
* मंगलप्रसंगी पुरुषांनी उघड्या डोक्याने का जाऊ नये ? ८१
* औक्षणाच्या वेळी पुरुषांनी डोक्यावर टोपी का घालावी अथवा आपला उजवा तळहात डोक्यावर का ठेवावा ? ८१
* सनातनने निर्मिलेली टोपी घातल्यावर आलेल्या अनुभूती ८९
* संपत्कालात टोपी न वापरणेच योग्य असणे ९१
* टोपीचा रंग आणि त्यानुसार वैशिष्ट्ये ९३
* टोपीचे प्रकार आणि त्यांची वैशिष्ट्ये ९४
८. भाव असलेले आणि चांगली आध्यात्मिक पातळी असलेले साधक, संत आणि गुरुकृपायोगानुसार साधना करणारे साधक यांनी बाह्य वेशभूषेला महत्त्व देण्याची आवश्यकता नसणे ९५

# मनोगत

हिंदुस्थानची सत्ता उपभोगून ब्रिटीश आपल्या संस्कृतीची पाळेमुळे हिंदुस्थानमध्ये घट्ट रुजवून गेले. हिंदु संस्कृतीत पूर्वापार चालत आलेली धोतर-अंगरखा (सदरा) यासारखी वेशभूषा त्यागून पाश्चात्त्यांची शर्ट-पँट, टाय-कोट (सूट) यांसारखी वेशभूषा हिंदूंनी बिनबोभाट स्वीकारली. हिंदूंचे हे सांस्कृतिक अधःपतन का झाले ? याचे कारण म्हणजे हिंदूंना स्वसंस्कृतीविषयी अभिमान उरला नाही. हा अभिमान न उरण्याचे कारण म्हणजे हिंदू स्वसंस्कृतीचे महत्त्वच विसरले. स्वसंस्कृतीचे महत्त्व विसरण्याचे कारण म्हणजे धर्मशिक्षणाचा अभाव ! यासाठीच हिंदूंच्या सांस्कृतिक वेशभूषेचे आध्यात्मिकदृष्ट्या असलेले महत्त्व या ग्रंथात सांगत आहोत.

हिंदु संस्कृती ही चैतन्यमय आहे. हिंदु संस्कृतीत स्थुलातील कारणांसह सूक्ष्मातील कारणांचा विचार करून, म्हणजेच आध्यात्मिक कारणमीमांसा लक्षात घेऊन सोवळे-उपरणे, धोतर-अंगरखा (सदरा) यांसारख्या वस्त्रप्रावरणांना महत्त्व दिले आहे. कपडे केवळ चांगले दिसणे, ते घालण्यातील सुलभता असा वरवरचा विचार न करता ते परिधान करणाऱ्या व्हाक्तीची सात्त्विकता वाढावी, तिचे वाईट शक्तींपासून रक्षण व्हावे, तिला ईश्वरी चैतन्य ग्रहण करता यावे आणि तिला ईश्वरप्राप्तीच्या प्रयत्नांत साहाय्य लाभावे असा सर्वांगसुंदर आणि सखोल विचार हिंदु संस्कृतीत केला आहे. याउलट पाश्चात्त्य संस्कृती ही रज-तमप्रधान असल्यामुळे जीन्स-टीशर्ट, कोट-टाय, शर्ट-पँट यांसारख्या वेशभूषांमुळे त्रासदायक स्पंदनांची निर्मिती झाल्याने या वेशभूषा वाईट शक्तींच्या आक्रमणांना (हल्ल्यांना) आमंत्रित करतात.

पाश्चात्त्य वेशभूषांमुळे होणारी आध्यात्मिक हानी आणि हिंदु वेशभूषांमुळे होणारे आध्यात्मिक लाभ या ग्रंथातील विवेचनावरून, तसेच साधकांनी केलेली सूक्ष्म-ज्ञानविषयक परीक्षणे, साधकांनी काढलेली सूक्ष्म- ज्ञानविषयक चित्रे आणि साधकांच्या अनुभूती यांवरून स्पष्ट होतात. ग्रंथाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, वेशभूषांच्या संदर्भात आधुनिक यंत्राद्वारे केलेल्या वैज्ञानिक प्रयोगांचा ग्रंथात केलेला अंतर्भाव. वाईट शक्तींचा त्रास नसलेले, वाईट शक्तींचा त्रास असलेले आणि आध्यात्मिक पातळी चांगली असलेले, अशा तीन प्रकारच्या साधकांनी 'पँट-शर्ट' आणि 'धोतर-अंगरखा' परिधान केल्यानंतर त्यांच्या शरिरातील कुंडलिनीचक्रांवर काय परिणाम होतो, याच्या नोंदी 'इलेक्ट्रोसोमॅटोग्राफिक स्कॅनिंग '(Electrosomatographic Scanning) या अत्याधुनिक वैज्ञानिक पद्धतीद्वारे अभ्यासल्या. या पद्धतीद्वारेही हेच लक्षात आले की, 'पँट- शर्ट' व्यक्तीच्या सप्तचक्रांतील रज-तमाचे प्रमाण वाढवते, पर्यायाने व्हाक्ती वाईट शक्तींच्या आक्रमणांना बळी पडते, तर 'धोतर-

अंगरख्या'मुळे व्यक्तीतील सप्तचक्रांना सात्त्विकता मिळते, पर्यायाने व्यक्ती ब्रह्मांडातील सात्त्विकता ग्रहण करू शकते. या प्रयोगांमुळे 'धोतर-अंगरखा' ही सात्त्विक वेशभूषा करण्याचे लाभ बुद्धीजिवींसमोर वैज्ञानिक दृष्टीकोनातून सिद्ध करता येणे शक्य झाले आहे. अध्यात्मात 'भाव तेथे देव', असे असते. भाव असल्यास किंवा आध्यात्मिक पातळी चांगली असल्यास कोणती वेशभूषा केली आहे, याला फारसे महत्त्व नसते. तेथपर्यंत पोहोचण्यासाठी मात्र प्राथमिक टप्प्याला धर्मात सांगितलेल्या आचारांचे काटेकोर पालन करून स्वतःची सात्त्विकता, पर्यायाने स्वतःचा आध्यात्मिक स्तर वाढवणे का आवश्यक असते, हे हा ग्रंथ वाचल्यावर लक्षात येईल.

आपले सध्याचे दैनंदिन जीवनमान पहाता 'प्रत्येक वेळी सात्त्विक वेशभूषेचा वापर करता येईल का', असा प्रश्न कोणाला पडू शकेल. शाळा, कार्यालये इत्यादी ठिकाणी असलेल्या नियमांनुसारच वेशभूषा करावी. शात्त्विक वेशभूषेचा आरंभ घरगुती जीवनापासून करावा आणि बाहेर जेथे शक्य होईल तेथे ती करावी. आपले आचरण पाहून इतरांनाही तशी वेशभूषा करण्याची प्रेरणा मिळेल. मग हळूहळू याचे लोण वाढत जाईल आणि अंती हिंदु संस्कृतीची उज्ज्वल पताका पुनश्च फडकवण्याचे आपले दायित्व आपण पूर्ण करू शकू.

सध्याच्या कलियुगात सात्त्विक वेशभूषा करण्यासह नियमित साधना केली, तरच रज-तमापासून आपले सर्वंकष रक्षण होईल आणि जीवन आनंदी बनेल. असे करण्याची सद्बुद्धी सर्वांना होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. - संकलक